साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

संस्थापक
साने गुरुजी

Date of issue
शनिवार,
२८ जुलै २०१८
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)

## दक्षिण आफ्रिकेच्या स्वातंत्र्यलढ्याची सुरुवात
संकल्प गुर्जर



## जन्माला न आलेली ‘जिओ’
रामचंद्र गुहा




## मुंबईजन प्रतिरोध संमेलनाची मागणी एसआयआयबी भारत छोडो!
संजय मं. गो.



Date of issue
२८ जुलै २०१८
वर्ष ७० / अंक : ४९

संपादक :
विनोद शिरसाठ

**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**

अंकनिर्मिती, व्यवस्थापक व अक्षररचना :
**सुरेश माने**

मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून,
**साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 / Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षांसाठी : ७०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १४०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २१०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. अंकातील छायाचित्रे इंटरनेटवरून.)

# अनुक्रम

४. संपादकीय
सिटी कॉलेजात प्रवेश

७. जन्माला न आलेली 'जिओ'
रामचंद्र गुहा

१०. नेल्सन मंडेलांचा उदय आणि दक्षिण अफ्रिकेच्या स्वातंत्र्यलढ्याची सुरुवात
संकल्प गुर्जर

१८. भाषेतून भाषेकडे... आणि भांषातराकडे
अविनाश सप्रे

२५. मुंबई जन प्रतिरोध संमेलनाची मागणी- एआयआयबी भारत छोडो!
संजय मंगला गोपाळ

३३. मंचात प्रवेश
डॅनिअल फ्रान्सिस मस्करणीस

३९. प्रतिसाद :
**अरुण कुकडे, रमेश पाध्ये**


Date of Publication- 19-7-2018

दृष्टिक्षेप

संजय मंगला गोपाळ

# मुंबई जन प्रतिरोध संमेलनाची मागणी - एआयआयबी भारत छोडो!

कोणत्याही प्रस्थापित किंवा डावा पुरोगामी पक्ष किंवा कामगार संघटनांनी पुढाकार न घेताही निव्वळ जनआंदोलने, स्वयंसेवी संघटना, फेरीवाला आणि मच्छीमार संघटना आदींनी एकत्र येऊन हा जनप्रतिरोध व्यक्त करण्याचे ठरवले आणि चळवळीतील प्रभावित अन्य समूहांनी याला भरभरून प्रतिसाद दिला. याचा एक स्पष्ट अर्थ म्हणजे, अशा प्रकारच्या सामूहिक आणि सामर्थ्यशाली अभिव्यक्तीची जनसमूहांना आवश्यकता भासत होती. एआयआयबीने निमित्त दिले आणि हा प्रतिरोध मुंबईच्या पावसात संघर्षांची धग दाखवून गेला! मध्य प्रदेशमधील हरसूद आता नर्मदा नदीवरील महाकाय धरणाच्या पाण्यात बुडाले आहे. मात्र २९ वर्षांपूर्वी हरसूदमधूनच व्यापक एकजुटीचे बिगुल 'नर्मदा बचाव' आंदोलनाच्या पुढाकाराने वाजविण्यात आले

अखिल मानवासोबत निसर्ग, पर्यावरणाचाही विकास, याबाबत मत-मतांतरे आढळतील. देश-राष्ट्र-राज्य- जिल्हा- गावाचा विकास याबाबतही व्यक्ती तितक्या प्रकृती समोर येऊ शकतील. पण एक गोष्ट कदाचित निर्विवादपणे मान्य होऊ शकेल की, ज्या कोणत्या एककाचा विकास साधायचा त्या एककात उत्पादनवाढ, उद्योगधंदे सुरू राहणे, आदान-प्रदान, व्यापारविनिमय, रोजगारनिर्मिती असं सारं सातत्याने होत राहायला हवे. त्यासाठी यंत्रे हवीत, मानव ऊर्जा हवी, कच्चा माल म्हणून नैसर्गिक संसाधने हवीत आणि वित्तीय भांडवलही हवे. सर्वसाधारणपणे भांडवलीव्यवस्थेत च्या चक्रात भांडवलाला अनन्यसाधारण स्थान प्राप्त करून देण्यात आले आहे. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आशियाई विकास बँक यांसारख्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या माध्यमातून विविध देशांना वित्तीय पुरवठा करण्याचे काम गेली अनेक वर्षे सुरू आहे. या संस्थांसोबत स्पर्धा नव्हे तर भागीदारी आणि सहकार्य करण्याच्या हेतूने दोन वर्षांपूर्वी आशियाई पायाभूत विकास गुंतवणूक बँक - एआयआयबी (Asian Infrastructure Investment Bank - AIIB) स्थापन करण्यात आली आहे. या आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांच्या मते पायाभूत विकासाबाबत आशिया अद्याप अन्य विकसित खंडांच्या मानाने खूपच मागे पडला आहे. खुद्द आशिया विकास बँकेच्या अनुमानानुसार, ही दरी भरून काढण्यासाठी आशियात सुमारे ८०० बिलियन (हजार दशलक्ष) अमेरिकन डॉलर्सच्या गुंतवणुकीची आवश्यकता आहे. नव्याने स्थापित पायाभूत विकास गुंतवणूक बँक काही अंशी ही कमतरता भरून काढेल, असा बँक प्रवर्तकांचा दावा आहे. या बँकेची तिसरी वार्षिक बोर्ड मीटिंग गेल्या २५-२६ जून रोजी मुंबईत पार पडली. एआयआयबीच्या बेजबाबदार कर्जपुरवठा धोरणाच्या विरोधानिमित्त एकूणच पायाभूत सुविधेसाठी करण्यात येणाऱ्या वित्त-पुरवठ्यामधील आव्हाने, त्यामुळे होणारे नैसर्गिक साधनसंपत्तीचे नुकसान, पर्यावरणाबाबत बेपर्वाई आणि अशा अवाढव्य प्रकल्पांच्या परिणामस्वरूप निर्माण होणारी सामाजिक अस्वस्थता व स्थानिकांवरील अन्याय, यावर सखोल व परिपूर्ण चर्चा करण्यासाठी २१, २२ आणि २३ जून रोजी आंतरराष्ट्रीय गुंतवणूक संस्थांसंदर्भातील कृती गटाने पुढाकार घेऊन मुंबईत बँकेच्या वार्षिक मीटिंगला प्रतिसाद म्हणून 'पायाभूत सुविधा


Date of Publication- 19-7-2018

गुंतवणुकीबाबत जनतेचा आवाज' असे जन-प्रतिरोध संमेलन भरवले होते. यानिमित्ताने, कृतिगटाने गेले सुमारे तीन महिने देशभरातील शाश्वत विकासवादी संघटना, अन्याय्य आणि विनाशकारी तथाकथित विकास प्रकल्पांसमोर जनतेचा आवाज बुलंदपणे मांडत भकासीकरण रोखण्याच्या प्रयत्नात असणारी जनआंदोलने, कामगार व शहरी आणि ग्रामीण कष्टकरी संघटना यांना एकत्र आणून आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांच्या कार्यपद्धतीबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे काम अधिक जोमाने पुढे नेण्यात आले.

दिल्लीतील वित्तीय दायित्व केंद्र, जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय, राष्ट्रीय फेरीवाले संघटना, एन्व्हायरोनिक्स ट्रस्ट, राष्ट्रीय मच्छीमार फोरम आदी संस्था-संघटना या जनपरिषदेसह संयोजक होत्या. अपेक्षेपेक्षाही जागरूक आणि जोशपूर्ण प्रतिसाद देऊन देशातील सुमारे २०० संघटनांच्या १२०० हून अधिक प्रतिनिधींना आणि परदेशातील काही समर्थक यांनी उपस्थित राहून या परिषदेची आवश्यकता जणू सुरुवातीसच अधोरेखित केली. त्यानंतरच्या दोन दिवसांत झालेल्या एकोणीस विविध चर्चासत्रांत मोठ्या संख्येने उपस्थिती लावत आणि २३ जूनला समारोपाला घनघोर चर्चेअंती राजकीय प्रस्ताव पारित केल्यानंतर आझाद मैदानात संघर्षगीतांनी समारोप होईस्तोवर हा जोश असाच कायम ठेवून, यानंतरच्या लढ्यातही सामील होण्याच्या निर्धाराची ग्वाही दिली.

### चीनच्या पुढाकाराने नव्या आशियाई बँकेची मुहूर्तमेढ

चीनचे राष्ट्राध्यक्ष झी जिनपिंग यांनी २०१४ साली या बँकेची संकल्पना मांडली आणि त्यानंतर अवघ्या दोन वर्षांत १६ जानेवारी २०१६ रोजी सदर बँकेचा कारभार सुरूही झाला. या बँकेने एकविसाव्या शतकातील प्रामुख्याने आशियातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणे, हे आपले लक्ष्य असल्याचे घोषित केले आहे. या बँकेचे एकूण ५७ देश सदस्य असून त्यात आशियातील बहुसंख्य देशांबरोबरच जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स यांसारखे युरोपियन देशही सामील आहेत. जपान व अमेरिका या दोन बलशाली अर्थव्यवस्था मात्र अद्याप या बँकेपासून दूरच आहेत. या बँकेचे विद्यमान भांडवली मूल्य आशिया विकास बँकेच्या दोन-तृतीयांश आणि जागतिक बँकेच्या जवळपास निम्म्याने आहे. पुढील सात-आठ वर्षांत हे मूल्य जागतिक बँकेपेक्षा जास्त असेल, असा दावा ही बँक करते. पश्चिमी देशांचा वरचष्मा असणाऱ्या आजवरच्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या तालावर आशियाई देशांना नाचावे लागते, या भूमिकेतून या वर्चस्वाला आव्हान देण्याच्या इराद्याने चीनने हे पाऊल उचलले असण्याची दाट शक्यता या क्षेत्रातले तज्ज्ञ व्यक्त करतात. दुसरे काही चिनी हितसंबंध तर उघडच दिसत आहेत आणि ते म्हणजे- आपले व्यापारी हितसंबंध जपण्यासाठी आणि आपल्याकडील वाढीव परकीय चलन आशियामधील पायाभूत प्रकल्पांमध्ये गुंतवून त्यानिमित्ताने चीनच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळवून देणे, 'एक पट्टा- एक रस्ता', 'नवीन सिल्क मार्ग' अशा आशिया आणि युरोप यांना रेल्वे, रस्ते व समुद्रमार्गे जोडणाऱ्या चीनच्या नवीन दळणवळण योजनांचा प्रसार करणे. याशिवाय २०१३-१४ पासून चीनच्या अर्थव्यवस्थेत मंदी आली असून बाहेरच्या देशात काही गुंतवणूक करता आली तर ती या मंदीतून बाहेर पडण्यास साह्यभूत ठरू शकेल, असाही चीनचा होरा आहे.

चीनने २०१४ मध्ये ही तयारी सुरू केली, त्याच सुमारास भारतात सत्तांतर होऊन भाजपचे सरकार सत्तेवर आले होते. सत्तेवर येताच सरकार या वाटाघाटीत सामील झाले आणि ऑक्टोबर २०१४ मध्ये या संदर्भातील ठरावावर देशाच्या वतीने स्वाक्षऱ्याही झाल्या. देशाचे अर्थमंत्री अरुण जेटली या बँकेच्या संचालक मंडळावर असून बारा कार्यकारी संचालकांमध्ये भारताचे डी.जे. पांडियन हे अर्थतज्ज्ञ बँकेचे मुख्य गुंतवणूक अधिकारी म्हणून काम पाहतात. श्री.पांडियन यांनी २०१० पासून गुजरातमध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांसोबत काम केलेले आहे. त्या वेळी 'हिंदू' दैनिकाने या दोघांचे वर्णन 'गुजरातवर राज्य करणारे दोघे जण' असा केला होता. भारत हा नव्या बँकेचा दुसऱ्या क्रमांकाचा भागधारक तर आहेच, पण गुंतवणुकीसाठीही बँकेने सर्वांत जास्त प्राधान्य भारतालाच दिल्याचे दिसते आहे. १९९१ मध्ये खुले आर्थिक धोरण देशाने स्वीकारल्यानंतर केंद्रात सत्तेवर कोणीही असले तरी विदेशी भांडवलाचा ओघ सतत वाढतच राहिला आहे. त्यामुळे भारताला थेट विदेशी गुंतवणूक अजिबात नवी नाही. मात्र ज्या गतीने ही गुंतवणूक येतेय आणि तितक्याच प्रमाणात ज्या रीतीने राष्ट्रीय हिताची धोरणे व प्राधान्यक्रम दुर्लक्षिले जात आहेत, ते चमकवून टाकणारे तर आहेच, पण सुजाण भारतीयांस काळजीत ढकलणारेसुद्धा आहेत!

देशातील जमीन आणि अन्य संसाधने देशी अव जागतिक उद्योगांच्या व संस्थांच्या ताब्यात देण्यासाठी देशांतर्गत कार्यप्रणालीत पारदर्शकता, उत्तरदायित्व व जबाबदारी, सामान्य जनतेचा असलेला सामुदायिक अधिकार यांसारख्या तत्त्वांकडे भारत सरकार अक्षम्य दुर्लक्ष करीत आहे. प्रकल्पांसाठी जमीन अधिग्रहणासंबंधित, विस्थापितांच्या पुनर्वसनासंबंधित, सुपीक शेतजमीन शहरीकरणासाठी वापरणे, तक्रारदारांना धाक दाखविणे आदींसंदर्भात अस्तित्वात असलेल्या कायद्यांच्या अनुपालनाकडे संपूर्ण काणाडोळा केला जातो आहे. आंध्र प्रदेशात अमरावती राजधानी शहर प्रकल्पात जबरदस्तीने जमीन अधिग्रहण, कृष्णा नदीच्या सुपीक खोऱ्याचे शहरीकरण अशा बेकायदा बाबी सर्रास घडत आहेत. प्रकल्पासाठी चुकीच्या जागा निवडण्याचा प्रकार केरळ आणि तमिळनाडूतही विद्युत्वहन व वितरण प्रकल्पातील उच्च विद्युत्भार असणाऱ्या तारांबाबतही झाला असून याचे थेट दुष्परिणाम स्थानिक लोकांचे आरोग्य, सुरक्षितता आदींवर होत आहे.

**एआयआयबी हा सत्ताधाऱ्यांचा नवा जुमला**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयक मेधा पाटकर या वेळी संमेलनाच्या उद्घाटनाच्या सत्रात म्हणाल्या की, एआयआयबीने थोड्याच दिवसांत नव्या गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी एक चकचकीत व्यवस्था तयार केली आहे, जो खरं तर एक धूसर पडदा आहे आणि त्याच्या मागे सामान्य जनतेचा न होणारा विकास लपवला गेला आहे. एआयआयबी हा सत्ताधाऱ्यांचा नवा जुमला असून सामान्य जनतेवर तो हमला आहे. पायाभूत विकासाच्या नावाखाली शहरी विकास, क्लस्टर विकास आदी गोंडस शब्द वापरत प्रत्यक्षात जमीन हडपण्याचे षडयंत्र सुरू आहे. देशात सर्वत्र पर्यावरणवादी आणि सामान्य जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांना त्रास देण्याचे सत्र सुरू असून, असे एकही राज्य नाही जिथे अशा चळवळीतील कार्यकर्त्यांना तुरुंगावास झाला नाही. स्थानिक स्तरावरील लढाया लढत असतानाच व्यापक धोरण हवे.

ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ व दिल्लीच्या समाजविज्ञान संस्थेतील प्रा.अरुण कुमार यांनी, एकूणच जगात सर्वच आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या वतीने ज्या विकास प्रारूपाचा प्रसार आणि प्रचार केला जातो तो विकास नक्की कुणाचा, हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. आतापर्यंतच्या अनुभवाने हेच दाखवून दिले आहे की, या सर्वांचे उद्दिष्ट हे फक्त नफाप्राप्ती असून जनसामान्यांच्या सुख-दुःखाशी आणि पर्यावरणाच्या रक्षणाशी त्यांचे काही



देणं-घेणं नाही. देशाचा आर्थिक विकासदर एक टक्का इतकाही प्रत्यक्षात राहिलेला नाही. त्यामुळे सरकारचे आर्थिक सल्लागार एकामागोमाग पळ काढीत आहेत, तर बहुसंख्य जनता आंदोलित आहे. राज्यसत्तेची जागा बाजार घेत असून सामाजिक आणि सामूहिक हितापेक्षा व्यक्तिवादी जीवन वाढीस लागले आहे. अधिक ते चांगले असा नवा विचार बोकाळत असून सर्वाधिक फायदा, खुलेआम लूट आणि हव्यास याचे आता उघड-उघड समर्थन होऊ लागले आहे, हे चिंताजनक आहे.

सर्वहारा जनआंदोलनाच्या उल्का महाजन यांनी एआयआयबीवर तोफ डागताना सांगितले की, पायाभूत सुविधांच्या नावाखाली हा वैश्विक धंदा असून यातून खरा विकास होणे अजिबात शक्य नाही. त्या पुढे म्हणाल्या, मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या नियोजन प्रस्तावात असे स्पष्टपणे म्हटले आहे की- हा प्लॅन वैश्विक पुंजीच्या पसंतीच्या जागांवर गुंतवणुकीसाठी आहे. कष्टकरी मागासलेल्या लोकांची बाजू घेऊन लढणे हे देशद्रोही कृत्य असेल, तर आम्ही ते करतच राहू. नवीन कामगार संघटना पुढाकाराच्या रोमा यांनी देशात पुन्हा आणीबाणी येत असल्याचा धोका विशद करताना अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील आक्रमणांकडे लक्ष वेधले. आर्थिक विश्लेषक आणि पत्रकार सुचेता दलाल यांनी सांगितले की, आज मोठमोठ्या कंपन्यांच्या हजारो करोडोंच्या बुडित कर्जांमुळे बँकिंग क्षेत्र कोसळण्याच्या मार्गावर आहे. हल्लीच संसदेने प्रायव्हेट कंपन्यांची २.४ लाख कोटी रुपयांची कर्जे माफ केली. हीच जर गरीब शेतकऱ्यांची कर्जे असती, तर सर्वांनी आकाश-पाताळ एक केलं असतं. पण आता एकही विरोधी शब्द बोलला जात नाही. देशातील सर्व कळीच्या अधिकारपदांवर परदेशस्थ भारतीयांना नियुक्त केले जात आहे, ज्यांचा या देशातील जनतेच्या सुख-दुःखाशी काडीमात्र संबंध नाही.

### पश्चिमी विकास हा कर्जवादी विकास

आशियाई विकास बँकेसंदर्भातील स्वयंसेवी संस्थांच्या आघाडीचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष आणि एन्व्हायरोनिक्स ट्रस्टचे श्रीधर राममूर्ती यांनी जपान, अमेरिका, युरोप आदी तथाकथित विकसित देशांवरील कर्ज हे त्या-त्या देशांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या दोनशे ते साडेतीनशे टक्के इतके प्रचंड आहे; तर भारत, फिलिपिन्स, इंडोनेशिया आदी विकसनशील देशांतील हे प्रमाण दोनशे टक्के इतके आहे, असे सांगत पश्चिमी विकास हा प्रायः कर्जाधारित किंवा कर्जवादी विकास असल्याचे स्पष्ट केले. राष्ट्रीय फेरीवाला फेडेरेशनचे कोलकाताहून आलेले शक्तिमान घोष यांनी पन्नास वर्षांपूर्वी जागतिक बँकेविरुद्ध विद्यार्थ्यांनी केलेल्या लढ्याची आठवण जागवत विदेशी मदतीवर आधारित प्रकल्पांमधे प्रथम बळी जातो तो असुरक्षित क्षेत्रातील फेरीवाले आणि झोपड्यांत वास्तव्यास असणारे कष्टकरी यांचाच. म्हणूनच फेरीवाला महासंघाने देशभरात १४ ते २१ जून या सप्ताहात सुमारे २०० कार्यक्रम करत 'एआयआयबी, भारत छोडो!'चा इशारा दिला आहे. राष्ट्रीय मच्छीमार संघटना आणि जागतिक मच्छीमार महासंघाचे लिओ कोलॅसो यांनी विनाशकारी विकास प्रकल्पांमध्ये जागतिक भांडवलदारांच्या गुंतवणुकीने किनारपट्टीवरील विध्वंस वाढीस लागतोय, असे सांगत भारताच्या संपूर्ण किनारपट्टीवरील दहा कोटी मच्छीमार आणि मत्स्यव्यवसायावर अवलंबून असणारे दहा कोटी अशा सर्वांवर या विध्वंसाचा सामना करण्याची वेळ आलेली आहे. किनारपट्टी नियंत्रण झोनसंदर्भात सरकारने प्रस्तावित संशोधनांविरुद्ध मच्छीमारांनी आवाज उठवला आहेच, तो इथे उपस्थित अन्य सर्वांच्या सहकार्याने अधिक बुलंद करू या!

ज्येष्ठ विचारवंत साथी गजानन खातू, महाराष्ट्र राज्याच्या नियोजन आयोगाचे सदस्य प्रा.एच.एम. देसरडा, सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा दळवी, ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते डॅनियल भाई, दिल्लीतील पर्यायी वाहतूकसंदर्भात कार्यरत राजेंद्र रवी, मुंबई महानगर विकास प्राधिकरण विरोधी जनतेचा विकास आराखडा मंचचे मनवेल तुस्कानो, टाटा समाजविज्ञान संस्थेत कार्यरत आर्थिक विषयांवरील अभ्यासक प्रा.संजीव चांदोरकर, मध्य प्रदेशचे माजी आमदार डॉ.सुनीलम, अरुणाचल प्रदेशचे राम, जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाच्या प्रफुल्ल सामंतरा, मीरा संघमित्रा, विश्वास उटगी, अशोक चौधरी आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

### कार्यशाळांमधून विविध पैलू आणि रणनीतीवर सखोल चर्चा

संमेलनाच्या मुख्य विषयाला धरून एकूण १९ कार्यशाळा- समूहचर्चांमध्ये संमेलनात आलेल्या देश-विदेशातील प्रतिनिधींनी सखोल चर्चा केल्या. कोर्बा जिल्ह्यात खाणीतून कोळसा उत्पादन होते आणि त्याच्या बाजूच्याच जिल्ह्यात अदानीच्या औष्णिक वीजनिर्मिती प्लांटला मान्यता देण्याचा निर्णय झाला आहे. त्यातही


Date of Publication- 19-7-2018

कळस म्हणजे, या प्लांटसाठी कोळसा सहा हजार किलोमीटरपेक्षा अधिक अंतरावरच्या ऑस्ट्रेलियातून येणार आणि भारतीय बंदरावरून तो ८०० किमी अंतर ट्रेनने आणणार! वर या प्लांटची वीज बांगलादेशला विकणार. या प्लांटमुळे होणारी तापमानवाढ मात्र आपण निमूटपणे सहन करायची. उद्योगपतींना आणि आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांना फायदा मिळावा या एकाच उद्देशाने असे उफराटे निर्णय ऊर्जेच्या व अन्य क्षेत्रात बिनदिक्कतपणे घेतले जात आहेत. खरी गरज आहे वीजनिर्मिती, वाहन आणि वाटपयंत्रणेत आमूलाग्र बदल करण्याची. त्याकडे मात्र अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे. जागतिक स्तरावर २०१५ मध्ये मंजूर केलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टातील सातवे कलम आहे, परवडणाऱ्या दरात स्वच्छ ऊर्जा सर्वांना उपलब्ध होणे. त्याआधी २०१२ मधील पॅरिस करारानुसार वीजनिर्मिती स्वच्छ मार्गाने निर्माण करणे आवश्यक आहे. या धोरणाखाली मोठे जलविद्युत आणि अणूआधारित प्रकल्प रेटले जात आहेत, अक्षय ऊर्जेचे नाही. खरे तर भारताकडे प्रत्यक्षात इतकी अतिरिक्त वीजनिर्मिती क्षमता अस्तित्वात आहे की, पुढील आठ-दहा वर्षे तरी नव्या वीजप्रकल्पाची गरज नाही! याशिवाय पाण्याचा वापर ऊर्जानिर्मितीसाठी केल्याने पाण्याचे दुर्भिक्ष, अनेक नद्यांची पात्रे कोरडी ठणठणीत, जनतेचे जबरदस्तीचे विस्थापन, वातावरणबदलाचे मोठे आव्हान या बाबीही गंभीर आहेत.

**भारतात औद्योगिक कॉरिडॉर्सचे वाढते जाळे**

देशभर इंडस्ट्रियल कॉरिडॉर्स प्रचंड वेगाने वाढत आहेत आणि त्यांना देशाच्या सीमेपार घेऊन जाण्याचे मनोरथही चालले आहेत. शेतकरी, कष्टकरी, स्थानिक समाज आदी देशाच्या विकासाच्या आराखड्यांमध्ये कुठेच दिसत नाहीत. सरकारपुरस्कृत थेट आणि अन्य मार्गांनी शक्य असेल तितकं जमिनींचं अधिग्रहण चालूच आहे. वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे बाधित असलेल्या लोकांचं योग्य पुनर्वसन होताना दिसत नाही. अतिरिक्त जमीन अधिग्रहित करण्यामागे कोणतं समर्थन असतं? शिवाय पार्लमेंटमध्ये यांचा उल्लेखही होत नाही. २०१३ च्या भूमी अधिग्रहण कायद्यामधील सुरक्षा नियम डावलण्यासाठी भूमी अधिग्रहण कायदाच बदलला जात आहे. सरकारवर घट्ट बसलेल्या कॉर्पोरेट जगताच्या पगड्यावर प्रश्न विचारले गेले पाहिजेत. त्याचबरोबर एक सर्वसमावेशक धोरण आखलं गेलं पाहिजे. आंतरराष्ट्रीय वित्तपुरवठा असणाऱ्या प्रकल्पांविषयीची लढाई आंतरराष्ट्रीय स्तरावर नेली पाहिजे, सरकारला नव्हे तर सामान्य जनतेला नजरेसमोर ठेवूनच कोणत्याही प्रकल्पाचे फायदे-तोटे व संभाव्य सामाजिक दुष्परिणाम यांचा विचार केला गेला पाहिजे. या देशामध्ये इंडस्ट्रियल कॉरिडॉर्सचा आम्ही विरोध करतो. या प्रकल्पामुळे सामान्य जनता, त्यांचा प्रकल्पातला सहभाग, तसेच लोकशाही व सांविधानिक हक्कांची पायमल्ली होत आहे. पर्यावरणाला गंभीर हानी पोहोचवणारी नैसर्गिक संसाधनांची लूट आम्हाला मान्य नाही.

**एआयआयबी आणि त्यांचा**
**'जल-अर्थव्यवस्थेतील' हस्तक्षेप**

सध्या भारतात शाश्वत विकासासाठी 'समुद्र बचाव' नावाने समुद्र व त्यावर अवलंबून असणाऱ्या मच्छीमारी आणि त्यावर आधारित अन्य व्यवसायाशी संबंधित लोकांच्या राहणीमानावर दूरगामी विनाश करणाऱ्या योजनेची सुरुवात होते आहे. या योजनेखाली अनेक कार्यक्रम राबवले जात आहेत. जसे- 'सागरमाला', नदी जोडणी प्रकल्प, नील क्रांती आणि इतर. या योजनांमध्ये सागरकिनारी मोठमोठे कन्व्हेयर बेल्ट्स लावण्याचा एक प्रकल्प आहे; ज्यामुळे किनाऱ्यावरील नैसर्गिक साधनसंपत्तीचा नाश तर होणारच, पण तेथील स्थानिकांना आपले व्यवसाय, शेती, घरे यांना मुकावे लागेल. तसेच किनाऱ्याजवळील साधी मासेमारी बंद होऊन खोल समुद्रातील मोठ्या कंपन्यांची मासेमारी सुरू होईल. किनाऱ्याजवळ माशांची शेती सुरू करण्यासाठी कृत्रिम तळी निर्माण केली जातील, पर्यटनव्यवसायाला बळ देण्याच्या नावाखाली पर्यावरणाचे नैसर्गिक संतुलन बिघडून जाईल. या सर्वामध्ये या प्रकल्पांना अर्थसाह्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या धोरणांचा खूप मोठा हात असणार आहे.

**लोकांवर गोळीबार - बुलेट ट्रेन**

सर्व जगभरासाठी ९७ ट्रिलियन (दहाचा बारावा घातांक!) डॉलर इतक्या गुंतवणुकीचा अंदाज आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांनी केला असून त्यापैकी ५२ टक्के आशियात व त्यातील सर्वांत जास्त चीन आणि भारतात असे नियोजन आहे. हा अंदाज वरती बसून पश्चिमी विकास प्रारूपनुसारच केलेला आहे. त्यात लोकांच्या गरजा प्राधान्याच्या ठिकाणी नाहीत! याच क्रमात देशात बुलेट ट्रेनचे प्रस्ताव एकामागोमाग करण्यात येत आहेत. या प्रकल्पांची संपूर्ण जीवनकाळातील किंमत आणि ती उभारण्यासाठी जे-जे

करावे लागेल त्यातून होणारे एकत्रित प्रदूषण हे वारेमाप आहे. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या उभारणीत सुमारे ३४ जलसाठे प्रभावित होणार आहेत. अतिवेगवान गाड्या अधिक विरोध करतात, त्यामुळे त्या धावण्यासाठी अतिरिक्त ऊर्जा खर्च होते. या प्रकल्पाच्या बांधकामामुळे परिसरातील शेतीही धोक्यात येते. या प्रकल्पासाठी जपानी कंपनीचे कर्ज येनमध्ये आहे. विनिमयाच्या वाढत्या दरानुसार ही परतफेड अगदी लहान व्याजदरानेही अव्वाच्या सव्वा असणार आहे आणि हा बोजा बुलेट ट्रेनच्या प्रवाशांवर नाही, तर कर भरणाऱ्या देशातील तमाम नागरिकांवर पडणार आहे. ३०० कोटी प्रतिमीटर इतका खर्च बुलेट ट्रेनसाठी करण्यापेक्षा साधारणतः २० कोटी प्रति

**मुंबईत झालेल्या जनपरिषदेत २३ जून २०१८ रोजी पारित झालेला ठराव (संक्षिप्त)**

लोकशाहीविरोधी आणि विध्वंसक अशा जागतिक अर्थकारणाला आव्हान :

**पर्यायी राजकीय आणि आर्थिक रचना**

देशातील आदिवासी, दलित, स्त्रिया, शेतकरी, मच्छीमार, फेरीवाले, कारागीर, असंघटित कामगार अशा शोषित मागासलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्यास सामाजिक संस्था, देशभरातून आलेले विचारवंत, कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक तसेच अमेरिका, युरोप, आशिया पॅसिफिक आणि जगातील अन्य भागातून आलेले याच विषयावर लढणारे कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत असा ठराव पारित करण्यात आला की- आपल्यासारख्या सार्वभौम, लोकशाही राज्यव्यवस्था असणाऱ्या देशात लोकशाही मूल्य न मानणाऱ्या आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांना थारा देऊ नये. या सर्व संस्था- एआयआयबीसहित- देशाच्या नागरिकांचे हक्क पायदळी तुडवतात, सरकारी नियम आणि यंत्रणांना न जुमानता देशाच्या राजकीय व आर्थिक सार्वभौमत्वाचा अनादर करतात.

भारतामधे एआयआयबीने सर्वांत जास्त कर्जपुरवठा केला आहे. याचा परिणाम म्हणून खासगी उद्योगांनी शेतजमीन बळकवण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत आणि कित्येक ग्रामीण व शहरी लोकवस्त्यांना विस्थापित व्हावं लागून त्यांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था या जागतिकीकरणाच्या आणि नवउदारमतवादी आर्थिक सुधारणांचे अग्रदूत व प्रचारक म्हणून काम करतात आणि गरीब व कामगारांच्या शोषणावर श्रीमंतांचे नफे वाढतात. या संस्थांनी आपल्या पैशाच्या बळावर अनेक देशांच्या लोकशाही प्रक्रियांमध्ये पद्धतशीरपणे खीळ घालून प्रतिगामी धोरणे आणायला भाग पाडलं आहे. जमिनीचे, नागरी सेवांचे आणि अन्नधान्याचे रूपांतर विकाऊ वस्तूंमध्ये करून सामान्य गरीब लोकांच्या हक्कांवर आणि राहणीमानावर हल्ला केला आहे. या संस्था नेहमीच अवाढव्य अशा प्रकल्पांमध्येच गुंतवणूक करतात, ज्यांची खरंच गरज आहे का आणि ज्यांचा देशाच्या नागरिकांना खरंच एवढा काही उपयोग होणार आहे का, याबाबत प्रामाणिक सर्वेक्षण केलं जात नाही. या सर्व व्यवहारात अनेक देशांतील बड्या कंपन्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात.

आपल्या सरकारकडे लोकांचे अन्न, पाणी, निवारा, कपडा, स्वास्थ्य, शिक्षण आणि रोजगार अशा मूलभूत गरजेच्या गोष्टींमध्ये गुंतवणूक करण्यासाठी पैशाची कमतरता आहे, पण अशा अनावश्यक प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी जनतेचा पैसा वापरण्यास सरकार तयार आहे; कारण आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था अशा मेगा प्रकल्पांनाच वित्तपुरवठा करायला राजी असतात, कारण त्यात त्यांचा फायदा असतो. एवढेच नव्हे, तर या संस्थांच्या प्रभावाखाली सरकार आपले संरक्षण, अन्नधान्य, पाणी, शेती, रोजगार यांसारख्या संवेदनशील क्षेत्रांविषयक धोरणे ठरवण्याचे कामही आंतरराष्ट्रीय विचारगटांना किंवा सल्लागार कंपन्यांना देते आहे, ज्यांच्यामार्फत देशाच्या नैसर्गिक संसाधनांवर आणि नागरिकांच्या जीवनशैलीवर बहुराष्ट्रीय बड्या कंपन्यांचे जास्तीत जास्त नियंत्रण राहते. संरक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रातही एआयआयबीसारख्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था- ज्यांच्यावर चीनचे वर्चस्व आहे- अशांना खासगी गुंतवणूक करण्यास परवानगी दिल्यामुळे येथे त्यांचा सहभाग येऊन देशाच्या सार्वभौमत्वाला तडा पोहोचू शकतो, विशेषत: जेव्हा संसदेसारख्या सर्वोच्च संस्थेला याबाबत अंधारात ठेवले जाते. आम्ही अशा विकासाच्या नावाखाली देशाला अस्थिरतेजवळ नेणारे सर्व प्रयत्न मोडून काढण्यासाठी अविरत संघर्ष करू. असा विकास म्हणजे मानवाधिकारांचे उल्लंघन, सामाजिक अस्थिरता आणि पर्यावरणाची हानी.

किमी दराने विद्यमान रेल्वे अधिक गतिमान करणे सहज शक्य आहे. मेट्रो प्रकल्पामुळे २००८ पासून दिल्लीत एकही नवी बस खरेदी झालेली नाही. अन्य शहरांत हेच होणार आहे. हा प्रश्न केवळ शेतकऱ्यांचा आणि आदिवासींचा नसून सर्व समाजाचा आहे. सर्व बिगरभाजप पक्षांनी महाराष्ट्रात बुलेट ट्रेनविरोधी भूमिका घेतली आहे. हा काही 'मेक इन इंडिया'चा आविष्कार नाही, संपूर्ण परदेशी मानवतेचा खेळ आहे. सामान्य लोकल ट्रेनने प्रवास करणारे नागरिक, प्रवासी संघ, रेल्वे युनियन्स आदींना सोबत घेऊन, 'भूक मिटवण्याची आहे की गती वाढवायची आहे', या मुद्याला धरून या प्रश्नावर व्यापक रान उठवले पाहिजे.

सरकारच्या अदूरदर्शी धोरणांमुळे देशातील अर्थव्यवस्था खिळखिळी झाल्याने शेतकरी आणि छोटे व्यावसायिक यांची अवस्था बिकट झाली आहे. छोटे अल्पभूधारक असुरक्षित शेतकऱ्यांना वाजवी हमी भाव मिळाला पाहिजे, ही साधी अपेक्षा सरकार पुरी करू शकत नाही, त्यामुळे अनियमित पावसावर आणि शेतकर्जावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना कोणी वाली राहिला नाही. परिणामी, गेल्या २० वर्षांत ३.५ लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत आणि हजारोंनी आपले गाव सोडले आहे. या संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी सरकार मोठ्या उद्योगांना हाताशी धरून त्यांच्या जमिनी बळकावत आहे. दुसरीकडे लाखो-करोडो रुपयांची बँकांची कर्जे बुडवून सरकारच्या मर्जीतील काही बडे उद्योगपती विदेशी फरार होत आहेत. आमची ठाम मागणी आहे की, जनतेच्या पैशांतून उद्योगांना दिलेले कर्ज कोणत्याही परिस्थितीत पुनर्प्राप्त केलेच पाहिजे, त्यासाठी त्या उद्योगपतींच्या व्यक्तिगत मालमत्तेमधूनही कर्जाची रक्कम परत मिळवली पाहिजे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि रोजगार या जनतेच्या मूलभूत गरजा निवरण्यासाठी हा जनतेचा पैसा वापरला गेला पाहिजे. सरकारचा धर्म हा जनतेचे हित बघणे आहे, त्याचे त्यांनी पालन केले पाहिजे. शेतकऱ्यांची, कामगारांची, लहान व्यावसायिकांची, आदिवासींची, कारागिरांची कर्जे माफ केली पाहिजेत. सरकारने जनतेची संसाधने आणि त्यांचे हक्क जतन करण्यासाठी त्यांची सहायता करावी आणि नागरिकांची प्रतिष्ठा व स्वायत्तता अबाधित ठेवावी अशी आमची मागणी आहे.

**जनपरिषदेत पारित मुख्य मागण्या**

जगभरातील सर्व कार्यकर्ते जे विध्वंसक विकासप्रकल्प आणि नीतिशून्य वित्तीय संस्था यांच्याविरोधात आंदोलन करत आहेत, त्यांना आम्ही आमचा संपूर्ण पाठिंबा जाहीर करतो.

आम्ही सर्व आर्थिक क्षेत्रात लोककेंद्रित विकल्प निर्माण करण्याची आणि असुरक्षित, दुर्बल व गरीब जनसमूहांना सामावून घेणाऱ्या सर्वसमावेशक अशा विकासाची मागणी करतो.

सामान्य जनतेच्या आकांक्षांना प्रतिसाद न देता अतिश्रीमंतांना आर्थिक मदत करणाऱ्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांचा आम्ही निषेध व विरोध करतो.

लोकांना प्रतिष्ठित आणि सभ्य काम मिळावे, शाश्वत शेतीचाच प्रसार व्हावा, सरकारी नोकरीत सर्वांना समान संधी मिळावी, सामान्य कारागीर आणि नैसर्गिक संसाधनांवर आधारित उपजीविका करणाऱ्यांना, छोट्या व मध्यम उद्योजकांना स्वयंरोजगारासाठी कौशल्य प्राप्त करण्याची संधी मिळावी, यासाठी आम्ही चळवळ उभारण्याचा निर्धार करतो.

लोकतांत्रिक आणि विकेंद्रीकृत निर्णयप्रक्रियेचा आम्ही पाठपुरावा करतो.

एआयआयबीसारख्या प्रचलित आर्थिक संस्थांच्या लोकशाहीविरोधी आणि बेजबाबदार आर्थिक वर्चस्वाला आम्ही नेहमी विरोध करू.

आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही बहुलवादी समाज, देश आणि जग निर्माण करण्यास आम्हाला समर्पित करत आहोत. आम्ही सरकारांना धनिक उद्योगपतींच्या अधीन होण्याविरुद्ध, मानवी व नैसर्गिक संसाधनांचे शोषण होण्याविरुद्ध, भेदभावाविरुद्ध; सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय अन्यायाविरुद्ध; भ्रष्टाचार, लूटमार आणि हिंसा यांच्याविरुद्ध अथकपणे काम करू. आम्ही अशा समाजाच्या उभारणीसाठी बांधील आहोत, जो लोकतांत्रिक व धर्मनिरपेक्ष अशा तत्त्वांवर आधारित असेल आणि स्वातंत्र्य, समता, सभ्यता, बंधुभाव, प्रेम आणि सर्वांसाठी आदर या मूल्यांचा सन्मान करेल. आपल्या पृथ्वीचा, वसुंधरेचा मनापासून आदर करूनच हे शक्य होईल.


Date of Publication- 19-7-2018

## मुंबईतील बेस्टच्या जबाबदाऱ्या आणि त्यांच्यासमोरील आव्हाने

एके काळी देशातील अव्वल नं.१ म्हणून गाजलेली मुंबईची बेस्ट परिवहन सेवा आज अकार्यक्षम ठरवून त्यावर टीकेची झोड उठवली जातेय. याचा फायदा खाज़गी बससेवा कंपन्या उठवत आहेत आणि सार्वजनिक बससेवा दुर्बल होत चालली आहे. बेस्टच्या सुमार कामगिरीला फक्त बेस्टची अकार्यक्षमता करणीभूत नसून, सतत चालू असलेली रस्त्यांची कामे आणि अतिप्रमाणात वाढलेला ट्रॅफिकसुद्धा तितकाच जबाबदार आहे. पण हे दुर्लक्षित करून बेस्टला दोष देऊन ही बससेवा क्षीण करण्यामागे सरकार आणि खासगी बसकंपन्यांच्या अभद्र युतीचा हात आहे. जनतेने हे कारस्थान समजून घेऊन हे लक्षात घेतले पाहिजे की, बेस्ट बससेवा बंद झाल्यास सार्वजनिक वाहतूकसेवा खूप महाग होईल आणि त्यावर जनतेचे नियंत्रण राहणार नाही. याचा जास्तीत जास्त त्रास सामान्य माणसाला होणार आहे. त्यामुळे बेस्टला पाठिंबा देऊन बससेवा सुधारण्याची संधी त्यांना दिली पाहिजे.

**जनप्रतिरोध संमेलनाची फलश्रुती**

प्रश्न केवळ विकासाचा नसून विकासाच्या पद्धतीचाही आहे, हे समजून घेणे आवश्यक आहे. ऊर्जानिर्मिती, दळणवळण, औद्योगिकीकरण आदी विकासकामे करायची तर पर्यावरणाला धक्का तर बसणारच, असा युक्तिवाद या संदर्भात केला जातो. पश्चिमी देशांनी आधीच प्रचंड विकास साधल्यानंतर आता तिथल्या कसोट्या आपल्यासारख्या विकसनशील देशात जशाच्या तशा लावण्याविरुद्ध आगपाखड केली जाते. मग असा आग्रह धरणारे सर्व विकासविरोधक आणि म्हणून राष्ट्रविरोधक अशी सर्वांची संभावना केली जाते. प्रत्यक्षात विकासप्रकल्पांच्या नावाखाली देशी किंवा विदेशी कॉर्पोरेट कंपन्या ज्या बिनदिक्कतपणे कायदा, स्थानिक जनतेचे किमान जगण्याचे हक्क आदींबाबत अनास्था दाखवतात, अनेकदा पोलिसी बळाचा वापर करून प्रकल्प रेटतात; त्याच्या अंतिमतः होणाऱ्या दुष्परिणामांची आणि विकासाऐवजी प्रत्यक्षात भकासीकरणाची असंख्य उदाहरणे यासंदर्भात लक्षात घेणे आवश्यक आहे. अगदी अलीकडचे तमिळनाडूतील थुतीकुडी येथील तांब्याच्या स्टरलाईट प्रकल्पाचे उदाहरण स्वयंस्पष्ट आहे. तारापूर आणि अन्य अणुऊर्जा प्रकल्पग्रस्तांच्या हृदयदावक कहाण्या विकासाची गाथा गातात की भकासीकरणाची; याचा विचार नफा, इगो, राजकीय फायदा आदी बाजूला सारून होणे अत्यावश्यक आहे. या सर्व प्रक्रियेत विधिनिषेध न बाळगता प्रकल्प रेटून पुरे करण्यातून एक अपरिहार्य अशी मागे न फिरण्याची (irreversibility) वेळ सर्वांवर आणण्याची वाईट खोडही अनुस्यूत असते!

कोणत्याही प्रस्थापित किंवा डावा पुरोगामी पक्ष किंवा कामगार संघटनांनी पुढाकार न घेताही निव्वळ जनआंदोलने, स्वयंसेवी संघटना, फेरीवाला आणि मच्छीमार संघटना आदींनी एकत्र येऊन हा जनप्रतिरोध व्यक्त करण्याचे ठरवले आणि चळवळीतील प्रभावित अन्य समूहांनी याला भरभरून प्रतिसाद दिला. याचा एक स्पष्ट अर्थ म्हणजे, अशा प्रकारच्या सामूहिक आणि सामर्थ्यशाली अभिव्यक्तीची जनसमूहांना आवश्यकता भासत होती. एआयआयबीने निमित्त दिले आणि हा प्रतिरोध मुंबईच्या पावसात संघर्षांची धग दाखवून गेला! मध्य प्रदेशमधील हरसूद आता नर्मदा नदीवरील महाकाय धरणाच्या पाण्यात बुडाले आहे. मात्र २९ वर्षांपूर्वी हरसूदमधूनच व्यापक एकजुटीचे बिगुल 'नर्मदा बचाव' आंदोलनाच्या पुढाकाराने वाजविण्यात आले होते. दिवंगत बाबा आमटे, स्वामी अग्निवेश, शबाना आझमी आदी मान्यवरांसोबत देशभरातून कष्टकरी, शोषित लडाकू जनसमूहाने त्या वेळी 'विकास चाहिये! विनाश नहीं!!' ही घोषणा सर्वप्रथम दिली होती. जनविकास आंदोलन, भारत जनआंदोलन आदी आघाड्या तयार होत होत त्यातूनच निघालेला व्यापक मंच म्हणजे– जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय– आज अधिक व्यापक होत, बदललेली परिस्थिती लक्षात घेऊन अधिक प्रभावी पद्धतीने लढाई आणि त्याचबरोबर शाश्वत विकासवादी नावीन्यपूर्ण निर्मिती अशा दुहेरी आघाडीवर सक्रिय आहे. मुंबईतील संमेलनानंतर आता जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाची तयारी सुरू आहे, २ ऑक्टोबरपासून सुमारे सव्वादोन महिने चालणाऱ्या समाज–संसाधन–संविधान सन्मान या राष्ट्रव्यापी जागर संगराची!

**संजय मंगला गोपाळ**
sanjaymg@me.vjti.ac.in


Date of Publication- 19-7-2018